सांगली जिल्हा परिषद, सांगली
प्राथमिक शिक्षण विभाग
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली-मिरज मार्ग, पुष्पराज चौक, सांगली, ता. मिरज, जि. सांगली
कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक-०२३३-२३७२७१७ Email ID - eoprisang@gmail.com


जा.क्र.जि.प.सां./प्रा.शि.वि./ A.D.T.F./वशि-१३५३/३३९०/२०२५, दिनांक:-०२/०३/२०२५.

**अंमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजना समिती (Anti Drugs Task Force), सांगली अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी वातावरण निमिर्ती व प्रबोधनकामी प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

**परिपत्रक**

मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, सांगली जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली आणि मा. जिल्हाधिकारी, सांगली, मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, सांगली, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली आणि आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आणि अंमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजना समिती (Anti Drugs Task Force), सांगली चे इतर सदस्य यांचे उपस्थितीत दिनांक:-०१/०३/२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये अंमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजना करणेकामी दिलेल्या सुचनेनुसार सांगली जिल्ह्यामध्ये अंमली पदार्थ विरोधी वातावरण निमिर्ती व प्रबोधनकामी प्रभावी अंमलबजावणी करणेची आहे. त्याकामी आयोजित स्पर्धेची रुपरेषा खालीलप्रमाणे:-

सदर बाबत अंमली पदार्थ विरोधी प्रबोधन करण्यासाठी १) चित्रफित (Videos), २) नादमधूर कविता (jingle)-Audio व ३) Digital Posters अशा तीन प्रकारे स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून त्यास रक्कम रुपये-५१,०००/- इतकी रक्कम बक्षीस स्वरुपात जाहीर करण्यात आली आहे.

सदर स्पर्धा ह्या गट स्तरावर संबंधित गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचे समितीमार्फत आणि सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये संबंधित प्रशासन अधिकारी यांचे समितीमार्फत राबविण्यात येणार असून त्यामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदविणे व अंमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजनेस मोलाचे सहकार्य देणेचे आवाहन मा. पालकमंत्री, सांगली जिल्हा यांनी सांगली जिल्ह्यातील रहिवाशांना केले आहे.

त्याकामी **समिती रचना** साधारणत: पुढील प्रमाणे-

१) **पंचायत समिती स्तर**:-
   १) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती - अध्यक्ष.
   २) विषय तज्ञ - सदस्य.
   ३) नशा मुक्तीची जाण असणारा NGO कार्यकर्ता - सदस्य.
   ४) कला-संस्कृतीची जाण असणारा कार्यकर्ता - सदस्य.
   ५) NCC प्रतिनिधी - सदस्य
   ६) शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती - सदस्य सचिव

२) **जिल्हा परिषद स्तर**:-
   १) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली - अध्यक्ष.
   २) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली - सदस्य.
   ३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली - सदस्य.
   ४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली - सदस्य.
   ५) नशामुक्तीवर काम करणारे सामाजिक संस्था प्रतिनिधी- सदस्य.
   ६) जिल्हा माहिती अधिकारी, सांगली - विशेष आमंत्रित सदस्य.
   ७) तंज्ञस्नेही शिक्षक - सदस्य.

(पुढील पृष्ठावर)

८) प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय - सदस्य
९) शिक्षण विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली - सदस्य.
१०)शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सांगली - सदस्य सचिव.

**सदर स्पर्धा प्रकारानुसार निकष पुढील प्रमाणे:-**

**१) चित्रफित (Videos) -**

१. सदर प्रकार प्रबोधनकामी उपयोगात आणणेचे असलेने यामध्ये वयाची मर्यादा - अट नाही.
२. Video हा ६० ते ९० सेकंदांपेक्षा अधिकच्या कालावधीचा नसावा आणि HD Quality चा असावा. आवाजात सुस्पष्टता असावी.
३. सदर प्रकारामधून आशयघन, प्रभावी, आकर्षक (catchy) व नेमके प्रबोधन करणारे संदेश जाणे आवश्यक आहे. त्यामध्ये कोणत्याही जात-धर्म-प्रांत व महापुरुष यांचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. Video मधून भडक स्वरुपाचे प्रदर्शन अपेक्षित नाही. या संदर्भात कोणतीही तक्रार आल्यास त्यास सर्वस्वी संबंधित स्पर्धक जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.
४. चित्रफित संहितेला संबंधित लेखकाची सहमती आवश्यक आहे.
५. बक्षीसाची रक्कम -पहिला क्रमांक-र.रु.१५,०००/-
दुसरा क्रमांक-र.रु.१०,०००/-
तिसरा क्रमांक-र.रु.५,०००/-

**२) नादमधूर कविता (Jingle-Audio) -**

१. सदर प्रकार प्रबोधनकामी उपयोगात आणणेचे असलेने यामध्ये वयाची मर्यादा - अट नाही.
२. **Audio** हा तीस सेकंदांपेक्षा अधिकच्या कालावधीचा नसावा. आवाजात सुस्पष्टता असावी.
३. सदर प्रकारामधून आशयघन, प्रभावी, आकर्षक (catchy) व नेमके प्रबोधन करणारे संदेश जाणे आवश्यक आहे. त्यामध्ये कोणत्याही जात-धर्म-प्रांत यांचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यामधून भडक स्वरुपाचे प्रदर्शन अपेक्षित नाही.
४. नादमधूर कविता **(Jingle-Audio)** हे स्वनिर्मित असावेत. या संदर्भात कोणतीही तक्रार आल्यास त्यास सर्वस्वी संबंधित स्पर्धक जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.
५. बक्षीसाची रक्कम-पहिला क्रमांक-र.रु.५,०००/-
दुसरा क्रमांक-र.रु.३,०००/-
तिसरा क्रमांक-र.रु.२,०००/-

**३) Digital Posters -**

१. सदर प्रकार प्रबोधनकामी उपयोगात आणणेचे असलेने यामध्ये वयाची मर्यादा - अट नाही.
२. त्यामधील **Content** हा **HD Quality** चा असावा.
३. सदर प्रकारामधून आशयघन, प्रभावी, आकर्षक **(catchy)** व नेमके प्रबोधन करणारे संदेश जाणे आवश्यक आहे. त्यामध्ये कोणत्याही जात-धर्म-प्रांत व महापुरुष यांचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. **Digital Posters** मधून भडक स्वरुपाचे प्रदर्शन अपेक्षित नाही.
४. **Digital Posters** हे स्वनिर्मित असावेत. या संदर्भात कोणतीही तक्रार आल्यास त्यास सर्वस्वी संबंधित स्पर्धक जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.
५. बक्षीसाची रक्कम -पहिला क्रमांक-र.रु.५,०००/-
दुसरा क्रमांक-र.रु.३,०००/-
तिसरा क्रमांक-र.रु.२,०००/-

(पुढील पृष्ठावर)

**स्पर्धेचे सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) चित्रफित-Videos, नादमधूर कविता (Jingle-Audios), Digital Posters अशा तीन प्रकारांबाबत Soft copy स्वरुपात (Audios, Videos & PDF) गटस्तरावर गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचे कार्यालयास आणि जिल्हास्तरावर प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे कार्यालयास दिनांक:- ०८/०३/२०२५ अखेर जमा करणेचे आहे.

२) गट स्तर व सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका स्तरावरील संबंधित समिती अध्यक्षांनी तीन क्रमांक काढून जिल्हा स्तरावर विहित मूदतीत सादर करणेचे आहेत.

३) जिल्हा स्तरावरील प्रथम तीन विजेत्यांना रोख स्वरुपात बक्षिसे दिली जातील व उर्वरित जिल्हा स्तरावरील सहभागी स्पर्धकांना सहभाग घेतलेबद्दल प्रमाणपत्र देणेत येईल.

४) निवड झालेले साहित्य नशा मुक्ती अभियानाचा प्रचार व प्रसार करणेकामी प्रसिध्द केले जाईल. सदर प्राप्त साहित्याबाबतचे स्वामीत्वाचे हक्क हे केवळ जिल्हा प्रशासनाने राखून ठेवले असल्याने त्याबाबत संबंधितांना परत केले जाणार नाही अथवा त्याबाबत कोणतीही मागणी करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

५) प्रसिध्द झालेल्या साहित्यासाठी कोणत्याही स्वरुपाचे स्वतंत्र शुल्क अथवा मानधन स्पर्धकांना अदा केले जाणार नाही अथवा त्याबाबत कोणतीही मागणी करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

६) सदरच्या स्पर्धा सांगली जिल्ह्यापुरत्या मर्यादित असून या स्पर्धेमध्ये सांगली जिल्हयातील स्पर्धकांनाच सहभाग घेता येईल. त्यासाठी सोबतच्या नमून्यातील प्रवेश अर्जासोबत ओळखीचा व रहिवासी पुरावा (आधार, इ.) सादर करणे बंधनकारक राहील.

**(तृप्ती धोडमिसे)** (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**सांगली जिल्हा परिषद, सांगली**

**प्रतिलिपी:-** १) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, (सर्व), जि. सांगली.
२) प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.
२/-उक्त प्रमाणे आपलेस्तरावरुन आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे मान्यतेने समिती गठीत करणेची असून पुढील आवश्यक ती कार्यवाही करणेची आहे.

**प्रत आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी:-**

१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
२) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली
३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सांगली.
५) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली.
६) जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, सांगली.
७) जिल्हा माहिती अधिकारी, सांगली.
२/- उक्त बाब अवलोकनी घेऊन सर्व प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दीबाबतची आवश्यक ती कार्यवाही आपलेस्तरावरुन करणेची आहे.
८) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व), जि. सांगली.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:-**

१) मा. जिल्हाधिकारी, सांगली,
२) मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, सांगली,
३) आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**प्रत :-** स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, सांगली जिल्हा.
२/- कृपया उक्त नमूद बाब मा. पालकमंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेत यावी.

**अंमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजना अंतर्गत**
**अंमली पदार्थ विरोधी वातावरण निमिर्ती व प्रबोधनकामी प्रभावी अंमलबजावणीविषयी**
**आयोजित विविध खुल्या स्पर्धा**

# प्रवेशिका

Photo

अर्जदाराचे नांव :-

राहण्याचा पत्ता :-
ता. , जि. सांगली.

संपर्क क्रमांक:-

आधार क्रमांक:-

**स्पर्धा प्रकार:- चित्रफित-Videos / नादमधूर कविता (Jingle-Audios) / Digital Posters**

**हमीपत्र**

१) सदर स्पर्धेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती पैंकी निवड झालेले साहित्य नशा मुक्ती अभियानाचा प्रचार व प्रसार करणेकामी प्रसिध्द करणेत येणाऱ्या साहित्याबाबतचे स्वामीत्वाचे हक्क हे केवळ जिल्हा प्रशासनाने राखून ठेवले असल्याने त्याबाबत परत मागणी केली जाणार नाही.

२) प्रसिध्द झालेल्या साहित्यासाठी कोणत्याही स्वरुपाचे स्वतंत्र शुल्क अथवा मानधन स्पर्धकांना अदा केले जाणार नसलेने त्याबाबत कोणतीही मागणी केली जाणार नाही, याची मला जाणीव आहे. तसेच त्या पूर्णपणे मान्य आहेत. त्यास कोणतीही हरकत राहणार नसून त्यावर कोणताही हक्क असणार नाही.

३) ओळखीचा व रहिवासी पुरावा सोबत जोडणेत आले आहे. (------------------)

ठिकाण :-

दिनांक:-

अर्जदाराची स्वाक्षरी

## संपर्क तपशील

| अ. क्र. | अधिकारी यांचे नांव | हुद्दा | संपर्क क्रमांक | ई-मेल आयडी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. पोपट मलगुंडे | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, शिराळा | 7020367580 | ssabrcshirala@gmail.com | |
| २ | श्री. अजिंक्य कुंभार | प्र. गट शिक्षणाधिकारी, वाळवा पंचायत समिती, इस्लामपूर | 9822551984 | ssabrcwalwa1@gmail.com | |
| ३ | श्री. सिध्दराय चिक्कलकी | प्र. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मिरज | 9607602113 | ssabrcmiraj@gmail.com | |
| ४ | श्री. आबासाहेब लावंड | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तासगांव | 9145780244 | ssabrctasgaon@gmail.com | |
| ५ | श्री. प्रमोद गोफणे | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कवठेमहांकाळ | 8329905654 | mdmkmahankal@gmail.com | |
| ६ | श्री. प्रकाश कांबळे | प्र. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पलूस | 9421125821 | ssabrcpalus@gmail.com | |
| ७ | श्री. विकास राजे | प्र. गट शिक्षणाधिकारी, खानापूर पंचायत समिती, विटा | 7387987482 | ssabrcvita@gmail.com | |
| ८ | श्री. ज्ञानेश्वर चिमटे | प्र. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कडेगांव | 9588646648 | ssabrckadegaon@gmail.com | |
| ९ | श्री. जगन्नाथ कोळपे | प्र. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, आटपाडी | 9423809928 | ssabrcatpadi@gmail.com | |
| १० | श्री. राम फरकांडे | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जत | 8605718463 | ssabrcjat@gmail.com | |
| ११ | श्री. रामचंद्र टोणे | प्र. प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका | 9175385181 | ssa_sanglimnp@yahoo.in | |